| ०५ | २३.११.२०२३ | १. मुख्याधिकारी या पदाचा वापर कार्यालयातील कोणकोणत्या अधिकारी व कर्मचारी यांना अधिकार आहे याची लेखी माहिती शासन निर्णयाप्रमाणे शासन निर्णयासह मिळावी,<br>२. लोहारा नगर पंचायतमध्ये सन २०२०-२०२३ या कार्यकाळात मुख्याधिकारी व अधिकारी कर्मचारी या पदावर काम करणाऱ्या कर्मचारी यांची लेखी माहिती,<br>३. लोहारा न.पं.मध्ये मुख्याधिकारी या पदाचा वापर करण्यासाठी कोणकोणत्या कर्मचारी व अधिकारी यांना अधिकार पत्र देण्यात आले याची शासन निर्णयासह माहिती मिळावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी वारंवार कार्यालयाकडे अर्ज सादर करतात. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मोघम स्वरुपाची माहिती मागितली असुन त्यांना नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.२३.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्देशानुसार माहिती हस्तगत करणेकामी अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. मात्र अपिलार्थी माहिती हस्तगत करणेकामी उपस्थित राहिले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6839 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ४७३७/२०२४**
**बोर्ड क्र.१३**

श्री.विक्रम सोपान गायकवाड, — अपिलार्थी
रा.रमाईनगर, सिव्हील हॉस्पिटलच्या पाठीमागे, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (आस्थापना),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार (स.सा.),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.संतोष पाटील उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १३ | २६.०२.२०२४ | सोबत जोडलेल्या पत्रामधील निलंबित कर्मचाऱ्यापैकी अंतिम निकाली निघालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती खालील मुद्यांवर द्यावी,<br>१. चौकशी मध्ये दोषी ठरले,<br>२. चौकशित निर्दोष निघाले,<br>३. सेवेतुन कमी केले,<br>४. सेवेत बहाल केले, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाची वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२२.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार पुरविता येणार नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देशित

केल्याप्रमाणे दि.२४.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना त्यांच्या पत्त्यावर व्यक्तिश: माहिती देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास इन्कार केलेला आहे. या नंतर अपिलार्थी यांना दि.२९.११.२०२४ रोजीच्या पत्रानुसार व्यक्तिश: माहिती दिली असता अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिश: स्विकारुन प्रत मिळाली अशी पोच दिलेली आहे. तसेच आयोगाकडील व्दितीय अपिलाची सुनावणी नोटीस कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर दि.१३.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना पुन:श्च सुधारित माहिती देण्यात आली असुन अपिलार्थी यांनी माहिती स्विकारुन आवश्यक माहिती मिळाली, अशी पोच दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन जशी जशी माहिती उपलब्ध झाली तशी तशी सुधारित माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6840 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७२४५/२०२४**
**बोर्ड क्र.१४**

श्री.अनंत गुरुनाथ कंदारे,
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव ... अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
तुळजा भवानी संस्थान मार्फत तहसिल कार्यालय, तुळजापूर,
ता.तुळजापूर, जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने श्री.एस.बी.गाढवे उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १४ | २९.०१.२०२४ | सैनिक शाळा तुळजापूर संस्थान तुळजापूर जि.उस्मानाबाद महिला कामगार चपाती लाटणार यांना दरमहा किती पगार देण्यात येते, |

आज रोजी सुनावणीदरम्यान धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, आयोगाकडील सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांच्या माहिती व प्रथम अपील अर्जाची शहानिशा केली असता सदर माहिती व प्रथम अपील अर्ज जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अप्राप्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज अप्राप्त असल्यामुळे या अर्जावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देणेस टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान उपस्थित प्रतिनिधी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादानुसार अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर करताना त्या सोबत सादर केलेल्या माहिती व प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज सादर

केल्याबाबतची पोच अथवा पोस्टाची पावती सोबत सादर केलेली नाही. ही बाब विचारात घेता, धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्यांश दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6841 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७६७२/२०२४**
**बोर्ड क्र.१५**

श्री.अनंत गुरुनाथ कंदारे,
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर,
ता.तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १५ | ०१.०४.२०२४ | राज्य माहिती आयोगाकडील व्दितीय अपील क्र.४२५५/२०१७, निर्णय दि.१३.०५.२०२० नुसार कार्यवाहीची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, आयोगाकडील सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांच्या माहिती व प्रथम अपील अर्जाबाबत शहानिशा केली असता, अपिलार्थी यांचा मूळ माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयाकडे अप्राप्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज अप्राप्त असल्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. आयोगाकडील सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, आयोगाने व्दितीय अपील क्र.४२५५/२०१७ मध्ये दि.१३.०५.२०२० रोजीच्या निर्णयाव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा तुळजापूर, जि.उस्मानाबाद

यांचेविरुध्द रु.५०००/- इतकी शास्ती अंतिम केलेली आहे. आयोगाकडील या निर्णयाची अंमलबजावणी झाल्याबाबतची माहिती अपिलार्थी यांना प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे अपेक्षित असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केलेला असुन मागणी केलेली माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२९.०४.२०२४ रोजीच्या पत्रासोबत जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचेकडे वर्ग केलेला आहे. मात्र मागणी केलेली माहिती तुळजापूर तहसिल कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी त्यांच्या दि.२६.०६.२०२४ रोजीच्या पत्रासोबत तुळजापूर तहसिल कार्यालयाकडे वर्ग केलेला आहे. सदर माहितीचा अर्ज तहसिल कार्यालयाकडे अप्राप्त असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाव्दारे हवी असलेली माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, तुळजापूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.शा.इं

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6843 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७८९०/२०२४
बोर्ड क्र.१६

श्री.प्रताप रामराव घोडके,
रा.लोहारा, ता.लोहारा, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल)
मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार (महसूल),
मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), श्री.संतोष पाटील उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०४.२०२४ | १. मी आपल्या कार्यालयाकडे दि.२१.०६.२०२३, दि.१७.०७.२०२३, दि.२१.०८.२०२३ व दि.२३.११.२०२३ रोजी दिलेल्या निवेदनावर आपण आदेश केलेल्या पत्रावर जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास विभाग, श्रेणी-१ यांनी केलेल्या कार्यवाहीच्या साक्षांकित प्रती मिळणे,<br>२. मी आपल्या कार्यालयाकडे दि.१८.१२.२०२३ व दि.३०.०१.२०२४ रोजी दिलेल्या निवेदनावर आपण संबंधितावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती मिळाव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज व प्रथम अपिलाचा अर्ज मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, धाराशिव यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केलेला त्याचा माहिती अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचेकडे वर्ग केल्याचे बटवाडा नोंदवहीवरुन दिसुन येत आहे. सदर वर्ग केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने नगर विकास शाखेकडुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. वास्तविक अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज मुख्यमंत्री सचिवालय कक्षास अप्राप्त असल्यामुळे या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी म्हणून कोणतीही

कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. अत: अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार जिल्हा सहआयुक्त, नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा सहआयुक्त, नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6842 दिनांक :- 26/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

१. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव
२. जिल्हा सहआयुक्त, नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -७९२१/२०२४**
**बोर्ड क्र.१७**

श्री.सुनिल किसन अस्वरे, — अपिलार्थी
राष्ट्रीय अध्यक्ष म.कु.ब. महासंघ, ओंकार नगर, बिबवेवाडी, सर्व्हे नं.२३८, पुणे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
सजा परंडा, ता.परंडा, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, परंडा, ता.परंडा, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.बालाजी रामकिसन डावकरे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.दुर्गाप्पा तुकाराम पवार, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव यांचे प्रतिनिधी, श्री.एस.बी.गाढवे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०५.२०२३ | १.परंडा तहसिलदार कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज का नाकारला,<br>२. परंडा येथील सर्व्हे नं.१२५ हे १.८०आर जमिनीची रजिस्टर इसार पावती कशी व कोणाच्या आदेशाने झाली, रजिस्टर ऑफिसमध्ये स्टॅम्प ड्युटी भरुन इसारपावती, फेरफार, सातबारा, इतर हक्कात नाव कसे आले... |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केलेला आहे. तथापि मागणी केलेली माहिती परंडा तहसिल कार्यालयाशी संबंधित

असल्यामुळे असा माहितीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन परंडा तहसिल कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज तहसिल कार्यालयाकडुन तलाठी कार्यालयास हस्तांतरित झालेला आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मोघम व प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात ७/१२ व फेरफारची नक्कल अपिलार्थी यांना देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6844 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ८५८८/२०२४
बोर्ड क्र.१८

श्री.सिध्देश्वर भिवराज खटके,
रा.भंडारवाडी, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (साप्रवि),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (साप्रवि),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एस.बी.गाढवे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये क्र.२०२४/साप्र/भुसुधार-१/कावि--, दि.११.०७.२०२४ बाबत सहा मुद्यांवर माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी याचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि.११.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर माहिती अपिलार्थी यांनी स्विकारुन पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देऊन पोच घेण्यात आलेली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी, माहिती दिल्याबाबत अपिलार्थी यांची पोच आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (साप्रवि), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना

कळविण्यात यावे.

२. उपजिल्हाधिकारी (साप्र), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6845 दिनांक : 26/06/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८६९५ व ८६९६/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.१९ व २०**

श्री.वैभव नामदेव घोळवे, — अपिलार्थी
रा.एन-९, २२/०४, शिवनेरी कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.भराडिया गोकुळ विष्णुदास उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १९ | २०.०५.२०२४ | आपल्या कार्यालयाच्या अखत्यारितील तालुका वाशी अंतर्गत येणारे गाव बावी व सोनारवाडी या गावात कार्यरत असलेले एकुण ग्रामरोजगार यांनी केलेले एकूण कामे त्याचा इस्टीमेट यासाठीचा आलेला निधी त्यावर केलेला खर्च व खर्च करण्याचे निकष देण्यात यावे, |
| २० | २०.०५.२०२४ | आपल्या कार्यालयाच्या अखत्यारितील तालुका कळंब येथील एनजीओ वॉटर शेड ऑर्गनायझेशन या संस्थेला देण्यात आलेला प्रस्ताव तसेच त्यांनी केलेले कार्य त्याचे एमबी व इस्टीमेट तसेच सदरील कामे करुन घेण्याचे व करण्याचे निकष देण्यात यावे, ०१ एप्रिल २०१९ ते २० मे २०२४ |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित आहे. ही बाब अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेली आहे. सदर मागणी केलेली माहिती पंचायत समिती कार्यालयाशी संबंधित असुन अपिलार्थी यांनी पंचायत समिती कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केला असल्याचे समजते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर केलेला युक्तिवाद याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.१२.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6846 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८६९७/२०२४
बोर्ड क्र.२१

श्री.वैभव नामदेव घोळवे,
रा.एन-९, २२/०४, शिवनेरी कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक प्रशासन अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, जि.धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२५.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री.प्रकाश सुब्राव शिंदे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.राठोड बी.ए. कृषि अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०५.२०२४ | आपल्या कार्यालयाच्या अखत्यारितील तालुका बार्शी अंतर्गत येणारे गाव बावी व सोनारवाडी या गावात कार्यरत असलेले एकुण ग्रामरोजगार यांची यादी देऊन त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी याची माहिती देण्यात यावी, तसेच त्यांच्या नियुक्तीचे निकष देऊन नियुक्तीवेळी दाखल केलेले दस्ताऐवज यांच्या प्रमाणित प्रती देण्यात याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती एकत्रित व संकलित करुन आज रोजी अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमोर स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6847 दिनांक :- 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८८८३/२०२४**
**बोर्ड क्र.२२**

श्री.आकाश लहु खंडागळे, अपिलार्थी
रा.केशेगाव, ता.जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अभिलेखपाल,
अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार (साप्रवि),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२४ | १.मुतखंब, २.तक्ते विरासत, ३.लँड एप्लिकेशन रजिस्टर, दुमाला जमिनीची नोंदणी पुस्तक, इंग्रज राजवटीतील इनाम कमिशनने केलेली सर्व्हे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अभिलेखपाल, अभिलेख कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपजिल्हाधिकारी (साप्र), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6848 दिनांक :- 26/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उपजिल्हाधिकारी (साप्र), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ९०८२/२०२४
बोर्ड क्र.२३

श्री.प्रताप रामराव घोडके, — अपिलार्थी
रा.लोहारा, ता.लोहारा, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (साप्र),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपजिल्हाधिकारी (सा.प्र.),
जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०६.२०२४ | मा.राज्य माहिती आयोग यांनी आपल्या कार्यालयाकडे जा.क्र.व्दि.अ.११५४२/२०२१/पी ६८०७, दि.२९.०४.२०२४ रोजी आदेश केलेल्या आदेशावर आपल्या कार्यालयाकडुन संबंधित कार्यालय व अधिकारी यांच्या केलेल्या कार्यवाहीच्या संपूर्ण साक्षांकित प्रती मिळाव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. सदर निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी

अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी वर नमूद जोडपत्र अ नुसार मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिल्याबाबतचा पुरावा जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगाच्या पटलावर सादर केलेला नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (साप्र), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपजिल्हाधिकारी (साप्र), जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6849 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ००५/२०२४**
**बोर्ड क्र.२४**

श्री.राजेंद्र मधुकरराव बरके,
रा.लक्ष्मीनगर गल्ली, किल्ले धारुर, ता.किल्ले धारुर, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग ०२,
सह जिल्हा निबंधक कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग ०१,
सह जिल्हा निबंधक कार्यालय, धाराशिव, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, खोली क्र.१८, धाराशिव — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, श्री.के.आर.कुलकर्णी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०९.२०२३ | आपल्या कार्यालयातंर्गत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ (२००६ चा अधि.क्र.४) अंतर्गत दि.१५ फेब्रु. २००६ पासुन अंमलात आला आहे, तरी अभिलेख अधिकारी म्हणून नामनिर्देशित केलेल्याचे संपूर्ण नाव, नियुक्ती दिनांक, कर्तव्ये, जबाबदारी सहीत लेखी पुराव्यानिशी माहिती साक्षांकित करुन मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१७.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशने या सदराखाली उपलब्ध असुन ती तेथुन प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी संकेतस्थळावर संपर्क करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी

दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती कागदपत्र स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नसल्यामुळे माहिती कागदपत्र स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6850 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६२३४/२०२४**
**बोर्ड क्र.२५**

श्री.प्रशांत बाबासाहेब बनसोडे, — अपिलार्थी
रा.अजिंठा नगर, अस्मिता निवास, धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक महसूल अधिकारी,
नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा सहआयुक्त,
नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी, श्री.कोलगणे आर.पी. उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०२.२०२४ | सन २०२२ ते आजतागायत,<br>१. जिल्हा सहआयुक्त नगर परिषद प्रशासन विभागास बहुजन एकता विकास परिषदेच्या वतीने दिलेल्या सर्व निवेदनाच्या तसेच तक्रारी अर्जाच्या सत्यप्रती देणे (धाराशिव नगर परिषद संबंधी),<br>२. बहुजन एकता विकास परिषदेने दिलेल्या सर्व निवेदनावर जिल्हा सहआयुक्त यांनी केलेल्या लेखी कार्यवाहीच्या सत्यप्रती देणे त्याचबरोबर नगर परिषद मुख्याधिकारी यांच्याकडुन आपल्या कार्यालयास ज्या ज्या निवेदनावर अहवाल सादर केला त्याचा सर्व सत्यप्रती देणे,<br>३. बहुजन एकता विकास परिषदेच्या वतीने दिलेल्या सर्व अर्जानुसार पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्याकडे सादर केलेल्या सर्व अहवालाच्या सत्यप्रती देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.२०.१२.२०२४ रोजी

व्यक्तिश: उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन, मागितलेली माहिती मिळाली, अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व अपिलार्थी यांनी माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6851 दिनांक : 06/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७८०८, ८२४६ ते ८२४९, ८२५४, ८२५७, ८२५८, ७९६१, ७९६३, ७९६४, ७९६५ व ९९११ /२०२४ (१३)**
**बोर्ड क्र.२६ ते ३८**

श्री.रमाकांत एस.हागलगुंडे, — अपिलार्थी
रा.अणदूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.२६, २७ व ३३) : उत्तरवादी क्र. १
सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र. २
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

३ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.२८,२९,३०,३१ व ३२) : उत्तरवादी क्र. १
पुरवठा निरीक्षण अधिकारी,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

४. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र. २
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

५. जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.३४, ३५ व ३६) : उत्तरवादी क्र. १
सह जिल्हा निबंधक वर्ग-२,
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

६. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र. २
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

७. जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.३७ व ३८) : उत्तरवादी क्र. १
दुय्यम निबंधक श्रेणी-१,
दुय्यम निबंधक कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

८. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र. २
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२०२४ (०४), दि.२८.०८.२०२४ (०३), दि.३०.०७.२०२४ (०१), दि.०७.०८.२०२४ (०४) व दि.११.११.२०२४ (०१) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तेरा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी बहुतांश जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तेरा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २६ | ०५.०२.२०२४ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी माझा दि.१९.१२.२०२३ रोजीचा माहिती अधिकार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठवून दिलेला आहे, माहिती अधिकार अर्जावर कोणती कार्यवाही केली आहे, याची संपूर्ण माहिती मिळावी, |
| २७ | ०४.०४.२०२३ | कोरोना काळात तुळजापूर तालुक्यातील कोणकोणत्या स्वयंसेवी संस्था व दानशूर नागरिकांकडुन गरजू लोकांना मोफत अन्न धान्याचे कीट वाटप केलेले आहे, याची संपूर्ण यादी त्यांच्या नावासह मिळावी |
| २८ | १८.०३.२०२३ | जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी माझा दि.१४.०२.२०२३ रोजीचा महाराष्ट्र शासनाला पाठविलेला माहिती अधिकार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठवून दिलेला आहे, आपण माझ्या माहिती अधिकार अर्जावर पुढील कोणती कार्यवाही केलेली आहे, याची संपूर्ण माहिती मिळावी, |
| २९ | २०.०२.२०२३ | शंकरराव भारत गॅस ग्रामीण वितरक जळकोट, ता.तुळजापूर आणि तेजल गॅस सर्व्हिसेस नळदूर्ग ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद यांनी अणदूर येथील दारिद्र्य रेषेखालील किती गरीब महिलांना पंतप्रधान उज्वला योजनेतून मोफत गॅस कनेक्शन दिलेले आहेत, याची संपूर्ण यादी त्यांच्या संपूर्ण नावासह मिळावी, |
| ३० | २१.०२.२०२३ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांनी माझा दि.२१.०१.२०२३ रोजीचा जिल्हा पुरवठा अधिकारी यांना पाठविलेला माहिती अधिकार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठवून दिलेला आहे, माझ्या माहिती अधिकार अर्जावर पुढील कोणती कार्यवाही केलेली आहे, याची संपूर्ण माहिती मिळावी, |
| ३१ | ११.०२.२०२४ | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी माझा दि.१९.१२.२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाला पाठविलेला माहिती अधिकार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठवून दिलेला आहे, माझ्या माहिती अधिकार अर्जावर कोणती कार्यवाही केलेली आहे, याची संपूर्ण माहिती मिळावी, |
| ३२ | ०२.०३.२०२४ | अणदूर ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथे अन्नपूर्णा योजनेचे एकुण किती लाभार्थी आहे याची संपूर्ण यादी त्यांच्या संपूर्ण नावासह मिळावी, |
| ३३ | ०३.०४.२०२३ | कोरोना काळात अणदूर ता.तुळजापूर जि.धाराशिव येथे किती कार्ड नसलेल्यांना गरजू लोकांना मोफत धान्य वाटप केलेले आहे याची संपूर्ण यादी त्यांच्या संपूर्ण नावासह मिळावी, |
| ३४ | २०.०२.२०२४ | जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी धाराशिव यांनी माझा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविलेला माहिती अधिकार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी मुद्रांक जिल्हाधिकारी साहेबांकडे पाठवून दिलेला आहे, मुद्रांक जिल्हाधिकारी साहेबांनी माझ्या माहिती अधिकार अर्जावर पुढील कोणती कार्यवाही |

| | | |
|---|---|---|
| | | केलेली आहे, याची संपूर्ण माहिती मिळावी, |
| ३५ | २३.११.२०२३ | जन माहिती अधिकारी आपण दि.०४.१०.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांना एक पत्र पाठविलेले आहे, तसेच आपण त्या पत्राच्या शेवटी असे म्हटलेले आहे की, आपल्या स्तरावर अर्जदार यांना परस्पर माहिती देऊन तसे या कार्यालयास अवगत करावे, तसेच तुळजापूर कार्यालयाने काय अवगत केलेले आहे, याची संपूर्ण माहिती मिळावी, |
| ३६ | ११.१०.२०२३ | जन माहिती अधिकारी नोंदणी महानिरीक्षक पुणे साहेबांनी माझा दि.१०.०५.२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाला पाठवलेला माहिती अधिकार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठवून दिलेला आहे, आपण माझ्या माहिती अधिकार अर्जावर कोणती कार्यवाही केलेली आहे, याची संपूर्ण माहिती मिळावी, |
| ३७ | २०.१२.२०२३ | जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी १ तुळजापूर आपण मला दि.२४.११.२०२३ रोजी एक पत्र पाठवलेले आहे, या पत्रात असे म्हटलेले आहे की, पत्र क्र.५२३ दि.०७.११.२०२३ अन्वये सुचित करण्यात आले होते, त्या अनुषंगाने श्रीमती बोंगरगे यांनी त्यांचा खुलासा दि.१०.११.२०२३ रोजी सादर केला आहे, त्या खुलाशाची प्रत मिळावी, |
| ३८ | १२.१०.२०२२ | मी दुय्यम निबंधक श्रेणी १ साहेबांना दि.२८.०९.२०२२ रोजी एक पत्र पाठवुन दिलेले आहे, तसेच दुय्यम निबंधक श्रेणी १ साहेबांनी माझ्या पत्रावर पुढील कोणती आवश्यक ती कार्यवाही केलेली आहे याची संपूर्ण माहिती मला मिळावी, |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज सादर करतात. बहुतांशवेळा अपिलार्थी वरिष्ठ कार्यालयाकडे माहितीचा अर्ज सादर करतात. मात्र माहिती क्षेत्रीय स्तरावर असल्यामुळे असे माहितीचे अर्ज वरिष्ठ कार्यालयाकडुन क्षेत्रीय कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात येतात. या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाव्दारे अपेक्षित असलेली कार्यवाही करण्यात येते. मात्र अपिलार्थी पूर्वीच्या माहिती अर्जाचा संदर्भ नमूद करुन पुन्हा माहिती अधिकारात माहितीचा अर्ज सादर करुन काय कार्यवाही केली अशी माहिती मागतात. म्हणजेच अपिलार्थी एका माहिती अर्जासाठी पुन्हा दोन तीन माहिती अर्जाची श्रृंखला तयार करतात. या सर्व माहिती अर्जावर अपिलार्थी प्रथम व व्दितीय अपील दाखल करतात. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती दिलेली असतानाही अपिलार्थी माहिती मिळाली नाही, माहिती दिशाभूल करणारी, अपूर्ण माहिती, अशा कारणांचा ऊहापोह करुन प्रथम अपिले दाखल करतात. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला असतानाही सुनावणी घेतली नसल्याच्या सबबीवरुन अपिलार्थी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करतात. अपिलार्थी यांच्या अशा वारंवार मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या भूमिकेचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होऊन नियमित शासकीय कामे प्रलंबित राहुन गरजू नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

३. माहिती अधिकार कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार माहिती अर्ज केल्याने शासकीय कामात अडथळा निर्माण होऊन शासकीय कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होतो.

एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालयाचे / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा अमर्यादित स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

४. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक

०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये, माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधले असुन या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

५. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय व्दितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर व्दितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. अपिलार्थी यांची उपरोक्त १३ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

२. जिल्हाधिकारी, धाराशिव यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा धाराशिव यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6865 दिनांक : 26/06/2025

प्रत :- माहिती तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित,
जिल्हाधिकारी, धाराशिव

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - ८५१५/२०२४**
**बोर्ड क्र.३९**

श्रीमती संध्या अनंत कंदारे,
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
जन संपर्क अधिकारी,
श्री तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार तथा व्यवस्थापक प्रशासन,
श्री तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार तथा व्यवस्थापक, श्री.अरविंद बोळंगे उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.११.२०२३ | सैनिकी शाळेमध्ये १४ वर्षापासुन स्वयंपाक काम करीत आहे, कायम नोकरी आदेश देणे..... |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज अप्राप्त असल्यामुळे या अर्जांच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना कोणतीही कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास तयार नाही, माझ्यावर अन्याय केलेला आहे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाव्दारे काही प्रशासकीय स्वरुपाच्या कार्यवाहीची अपेक्षा आहे. तथापि अशी बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ठ होत नाही. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाच्या अनुषंगाने, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना त्या सोबत सादर केलेल्या माहिती व प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज सादर केल्याबाबत पोस्टाची पावती अथवा कार्यालयाची पोच सोबत सादर केलेली नाही. ही बाब विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आज

रोजी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्यांश दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6866 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ५००३ व ५००६ /२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.४० व ४१**

श्री.अविनाश राजेंद्र पवार, अपिलार्थी
रा.वासुदेव गल्ली, तुळजापूर, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
जनसंपर्क अधिकारी,
श्री.तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तुळजाभवानी मंदीर संस्थान, तुळजापूर, जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) दोन अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४० | ०५.०२.२०२४ | आपल्या संस्थान तथा कार्यालय अनुसार महत्वाचे व अतिमहत्वाचे कोणाला मानले जाते त्या दस्ताऐवजाची छायांकित सत्यप्रत द्यावी,<br>आपल्या संस्थान तथा कार्यालय अनुसार महत्वाचे व अतिमहत्वाचे असलेल्या व्यक्तीच्या ठरावाची छायांकित सत्यप्रत देण्यात यावी,<br>आपल्या संस्थान तथा कार्यालय मार्फत महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्ती कसे ठरवले जाते त्या दस्ताऐवजाची छायांकित प्रत देण्यात यावी, |
| ४१ | ०५.०२.२०२४ | मंदीर संस्थान तर्फे महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्तीचे दर्शन सशुल्क स्पेशल पास दर्शन करण्यात आले व्यक्तीकडुन सशुल्क घेण्यात आलेल्या ऑडिट रिपोर्टची छायांकित प्रत देण्यात यावी,<br>मंदीर संस्थान महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्तीकडुन घेण्यात आलेल्या सशुल्क कोणत्या खात्यात जमा करण्यात आला त्या दस्तऐवजाची छायांकित सत्यप्रत देण्यात यावी, दि.०१.०६.२०२३ ते दि.१८.११.२०२३, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.४० मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अभिलेख स्वरुपात उपलब्ध नाही. तसेच बोर्ड क्र.४१ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने नमूद कालावधीतील ऑडिट झालेले नाही व या माहिती अर्जातील काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अभिलेख स्वरुपात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील अशी वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती / वस्तुस्थिती कळविली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश.**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6867 दिनांक :- 06/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७२९/२०२४
बोर्ड क्र.४२

श्री.तांबोळी मकबुल आल्लाउद्दीन, अपिलार्थी
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.संतोष पाटील व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.अरविंद बोळंगे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०९.२०२३ | आपल्या तुळजापूर तालुक्यातील कार्यरत तलाठी व मंडळ अधिकारी मुख्यालयी राहत असल्यासंबंधी ग्रामपंचायतचा ठराव किंवा अन्य विभागाकडुन मुख्यालयी राहत असल्याचे कोणते पुरावे आपल्या कार्यालयाकडे किंवा वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केले, सादर केलेल्या पुराव्यांची छायांकित प्रती व शासनाकडुन मासिक किती घरभाडे देण्यात येतात व मालकाच्या घरभाडे पावतीसह सर्व माहिती सत्यप्रत करुन देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे दोन मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. या दोन मुद्यांपैकी पहिल्या मुद्याची माहिती जसे मुख्यालयी राहत असल्याबाबतचे पुरावे अशी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच दुसऱ्या मुद्यांवरील माहितीव्दारे अपिलार्थी यांना

मासिक घरभाडे रक्कम व घरभाडे पावती अशी माहिती अपेक्षित आहे. तथापि सदर माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने व ती लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी असल्याने उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी तशी पोच देखील दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अधिकारात चुकीचा पत्रव्यवहार, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6868 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - २५०७/२०२४**
**बोर्ड क्र.४३**

श्री.योगेश बळीराम कानडे, — अपिलार्थी
रा.काक्रंबा, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.टी.कोळगे व श्री.संतोष पाटील आणि प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.अरविंद बोळंगे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.११.२०२३ | सन २०२२-२०२३, आपल्या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात किती पेट्रोल पंप आहेत त्या सर्व पेट्रोलपंपाच्या ठिकाणचे पत्ते, त्यांच्या चालकांची नावे व पत्ते, ऑईल कंपन्याचे नाव व पत्ते तसेच प्रत्येक पेट्रोल पंपाची इंधन प्रकारानुसार जास्तीत जास्त साठवण क्षमता, तसेच या पेट्रोलपंपाचे आपल्या कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी सन २०२२-२३ मध्ये केलेले तपासणी रिपोर्ट, त्यांच्या कार्यपध्दती बाबत नोंदविलेले शेरे, आक्षेप आणि टिपणी तसेच मालाची आवक व विक्री झालेल्या नोंदी यांच्या सत्यप्रती उपलब्ध करुन द्याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती दिशाभूल करणारी व बनावट स्वरुपाची आहे. माहिती अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या

अनुषंगाने दि.१९.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी अशी माहिती / वस्तुस्थिती व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी व बनावट स्वरुपाची माहिती दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी दिशाभूल करणारी व बनावट माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जासंदर्भात कार्यवाही केल्याबाबतची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6869 दिनांक : 26/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६१९५/२०२४**
**बोर्ड क्र.४४**

श्रीमती मनिषा पोपट माने, अपिलार्थी
रा.६०८/०२/२१, समर्थ नगर, जिजामाता नगर जवळ, तुळजापूर,
ता.तुळजापूर, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
दुय्यम निबंधक श्रेणी-१,
दुय्यम निबंधक कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सह जिल्हा निबंधक वर्ग ०१,
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, श्री.बी.जी.मादसवार उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०३.२०२४ | मी मनिषा माने आपल्या कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दि.२८.११.२०२३ व दि.३१.०१.२०२४ या तारखेचा अर्ज आपल्याकडे दाखल केलेला आहे, तरी आपल्या कार्यालयातर्फे काय कार्यवाही केलेली आहे त्याची छायांकित प्रती देण्यात याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१६.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जी माहिती व वस्तुस्थिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचे आज रोजी आयोगासमोर विचाराधिन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे..

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कार्यवाही केलेली छायांकित प्रत मिळावी, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०५.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6870 दिनांक : 26/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ८१७२/२०२४
बोर्ड क्र.४५

श्री.भिकाजी भिवा दंडे, — अपिलार्थी
रा.१४९, यामिनी नगर, विजापूर रोड, सोलापूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२१.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.संतोष पाटील व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, श्री.अरविंद बोळंगे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०३.२०२४ | माझी वडीलोपार्जित जमिन मौजे नानज ता.उत्तर सोलापूर येथे आहे, सन १९४७ च्या अगोदर हे गाव तुळजापूर तालुक्यात होते, त्या कारणास्तव १९४७ च्या अगोदरचे स.नं.२८३ पो हिस्सा १ ते १३ पर्यंतचे ७/१२ उतारे आणि संबंधित जमिनीचा नकाशा मिळावा, ही विनंती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही सन १९४७ पूर्वीची आहे. सदर माहितीचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला असता सदर माहिती अभिलेखात उपलब्ध नाही. त्यामुळे अशी माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील अशी वस्तुस्थिती अपिलार्थी यांना दि.१८.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय

पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सोलापूर जिल्ह्याशी संबंधित असल्याच्या निष्कर्षासह अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आदेशामधील दिलेली कारणे असमाधानकारक, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१५.०४.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6879 दिनांक :- 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७३१ व ७८६/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.४६ व ४७**

श्री.तांबोळी मकबुल आल्लाउद्दीन,
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ १.१ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.४६) : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (म-१),
तहसिल कार्यालय, धाराशिव

१.२ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.४७)
नायब तहसिलदार (निवडणूक),
तहसिल कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४६ | ०९.१०.२०२३ | आपल्या उस्मानाबाद तालुक्यातील कार्यरत तलाठी व मंडळ अधिकारी मुख्यालयी राहत असल्यासंबंधी ग्रामपंचायतचा ठरावा किंवा अन्य विभागाकडुन मुख्यालयी राहत असल्याचे कोणते पुरावे आपल्या कार्यालयाकडे सादर केले, सादर केलेल्या पुराव्याची छायांकित प्रती व शासनाकडुन मासिक किती घरभाडे देण्यात येते, घरमालकाच्या घरभाडे पावतीसह सर्व माहिती देण्यात यावी, |
| ४७ | ०७.०७.२०२३ | उस्मानाबाद तालुक्यातील सन २०२१ ते आजपर्यंत ग्रामपंचायत निवडणूकीच्या वेळेस उमेदवाराने आपल्या कार्यालयात एकूण किती उमेदवारांनी अनामत रक्कम (डिपॉझीट) भरले ग्रामपंचायत निहाय रक्कम, जर अदा करण्यात आली नसेल तर |

| | | |
|---|---|---|
| | | सदरील रक्कम कोणत्या खात्यात जमा करण्यात आली त्या खातेचा / चलन तपशिल, अदा करण्यात आली नसेल ती कोणत्या कारणाने अदा करण्यात आलेली नाही याची सर्व माहिती सत्यप्रत करुन देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारात चुकीचा पत्रव्यवहार केलेला आहे. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.४६ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात भाडेपत्राची प्रत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देऊन उर्वरित माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे ती पुरविता येत नसल्याचे अपिलार्थी यांना दि.१९.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच बोर्ड क्र.४७ मधील माहिती अर्जासंदर्भात तहसिलदार, धाराशिव यांनी त्यांच्या दि.१३.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी (निवडणूक) व सहायक जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक (निवडणूक) यांना माहिती उपलब्ध करुन देणेबाबत निर्देशित केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अधिकारात चुकीचा पत्रव्यवहार / माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आज रोजी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे बोर्ड क्र.४६ मधील माहिती अर्जातील माहिती / वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. मात्र बोर्ड क्र.४७ मधील माहिती अर्जातील माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत नाही. सदर बोर्ड क्र.४७ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (निवडणूक), तहसिल कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.४७ मधील जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास, तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.
२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6880 दिनांक : 29/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ४१६४/२०२४**
**बोर्ड क्र.४८**

श्री.भिका सुदामराव विद्यागर,
व्दारा-नेताजी गोरे माळी, तांबरी विभाग, म.फुले सभागृहाजवळ,
धाराशिव
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (पुरवठा),
तहसिल कार्यालय, धाराशिव
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव
: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा), श्री.अमोल प्रकाश बाहेकर, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.१०.२०२३ | शोभा भिकाजी विद्यागर या नावाने आपल्या कार्यालयातून शिधापत्रिका कोणत्या तारखेस वितरित केले संबंधी माहिती, १. शिधापत्रिकाची वितरण केलेली तारीख, २. किती युनीट संबंधी, ३. कोणत्या कागदपत्रान्वये (पुराव्याने) ते वितरित केले, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना ओदशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती व प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रस्तुत प्रकरणाची आयोगाकडील सुनावणीची नोटीस कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद शिधापत्रिका धाराशिव तहसिल

कार्यालयाकडुन अदा केलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील अशी वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्याची कार्यवाही केली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती / वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6881 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४७३५/२०२४
बोर्ड क्र.४९

श्री.प्रशांत वसंत वराळे,
रा.मुळेवाडी, पो.किणी, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.जी.शिंदे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०२.२०२४ | मामलतदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये मौ.मुळेवाडी, ता.जि.धाराशिव येथील जमीन गट क्र.१५१ चे मध्यभागातून जमीन गट क्र.१५२ व १५३ च्या बांधावरुन पूर्वापार असलेला रस्ता खुला करुन मिळणेबाबतच्या प्रकरणाची संपूर्ण संचिका, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणाच्या आदेशाची प्रत उपलब्ध असुन उर्वरित माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. सदर आदेशाची प्रत अपिलार्थी यांना देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्यास ती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीच माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील आदेशाची प्रत अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमोर स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.6882 दिनांक :- 02/06/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६९०३/२०२४**
**बोर्ड क्र.५०**

श्री.आकाश लहु खंडागळे,
रा.केशेगाव, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.जी.शिंदे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२४ | १. मौजे बामणी ता.जि.धाराशिव येथील गट नंबर १५६ सर्वे नंबर ७१ मधील शेतजमीन रामा बाळा खंडागळे यांच्या नावे सिलिंग कायद्याअंतर्गत वाटप झालेल्या आदेशाची संपूर्ण संचिका,<br>२. रामा बाळा खंडागळे यांच्या नावे सिलिंग जमिन वाटप तक्त्याची नक्कल,<br>३. मौ.बामणी ता.जि.धाराशिव (उस्मानाबाद) येथील सिलिंग कायद्यातंर्गत वाटप करण्यात आलेली जमीन याची संपूर्ण यादी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे संबंधितांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील

निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दि.०८.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः प्राप्त करुन घेऊन, माहिती प्राप्त झाली, अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6883 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६९७०/२०२४**
**बोर्ड क्र.५१**

श्री.तय्यब महंमद हनिफ शेख,
रा.दुधगाव, ता.जि.धाराशिव
अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव
उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे विधीज्ञ उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.१२.२०२३ | मौजे दुधगाव ता.जि.धाराशिव गट नंबर ३९ मधील कबालाची यादी, मोजे दुधगाव ता.जि.धाराशिव येथील गट नंबर ३९ मधील सन १९९० पुढील वितरित करण्यात आलेल्या कबालाची यादीची नक्कल मिळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती तहसिल कार्यालयाकडे मागितली असता सदर माहिती उपविभागीय अधिकारी कार्यालयाशी संबंधित असल्याचे तहसिल कार्यालयाने अवगत केलेले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केला तर माहिती तहसिल कार्यालयाशी संबंधित असल्याचे अवगत केलेले आहे. मागणी केलेली माहिती तहसिल कार्यालयाकडुनही मिळाली नाही व उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडुनही मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6852 दिनांक :- 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६९७१/२०२४**
**बोर्ड क्र.५२**

श्री.तय्यब महंमद हनिफ शेख,
रा.दुधगाव, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे विधीज्ञ, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री.एम.जी.शिंदे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.१२.२०२३ | मौजे दुधगाव ता.जि.धाराशिव येथील गट नंबर ३९ मधील कबालाची यादी, मौजे दुधगाव ता.जि.धाराशिव येथील गट नंबर ३९ मधील सन १९९० पुढील वितरित करण्यात आलेल्या कबालाची यादी व नक्कल मिळावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती तहसिल कार्यालयाकडे मागितली असता सदर माहिती उपविभागीय अधिकारी कार्यालयाशी संबंधित असल्याचे तहसिल कार्यालयाने अवगत केलेले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केला तर माहिती तहसिल कार्यालयाशी संबंधित असल्याचे अवगत केलेले आहे. मागणी केलेली माहिती तहसिल कार्यालयाकडुनही मिळाली नाही व उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडुनही मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध

संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांना आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

क्र. 6853 दिनांक :- 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ६९७६/२०२४
बोर्ड क्र.५३

श्री.सचिन विजयकुमार सर्जे, अपिलार्थी
रा.शाहु नगर, काकडे प्लॉट, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
तलाठी सजा, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.राजेश पडवळ, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एम.जी.शिंदे, नायब तहसिलदार उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०३.२०२४ | सर्व्हे नंबर २५९ मधील फेरफार क्र.२३९२३ ची संचिका माहिती देण्यात यावी,<br>१. दत्त नगर गृहनिर्माण संस्था मर्यादित उस्मानाबाद सर्व्हे नंबर ११६/१२ मध्ये घेण्यात आलेले सर्व फेर फार संचिका माहिती देण्यात यावी (सातबारा तयार झालेल्या पासुनचा),<br>२. सिटीसर्व्हे हद्दीमध्ये असलेल्या सर्व्हे नंबर आपण घेतलेल्या सर्व फेरफार नोंदी व आदेश कॉपी वरील सर्व मुद्यांची सविस्तर माहिती देण्यात यावी,<br>३. मागील पाच वर्षामध्ये आपण घेतलेल्या सर्व फेरफार संचिका नोंदी व टॅक्स पावत्याची झेरॉक्स परत मिळण्याबाबत सर्व मुद्यांची सविस्तर माहिती देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्ज सादर केला त्या कालावधीमध्ये लोकसभा निवडणूकीच्या कामकाजात कर्तव्य पार पाडणे आवश्यक असल्यामुळे अशी माहिती विहित कालावधीमध्ये देता येणे शक्य झालेले नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५

दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती एकत्रित / संकलित करुन अपिलार्थी यांना दि.२८.०६.२०२४ रोजी व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी सदरची माहिती स्विकारुन पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6859 दिनांक :- 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८५६८/२०२४**
**बोर्ड क्र.५४**

श्री.अरुण बाबुराव पाटील, — अपिलार्थी
रा.स्वामी समर्थ निवास, सदगुरु नगर, जुना औसा रोड, कालिका देवी मंदीर मागे, लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.जी.शिंदे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०३.२०२४ | फेरफार क्र.२७४७ गट क्र.१३७ मौजे नितळी ता.जि.धाराशिव बाबत,<br>मौजे नितळी ता.जि.धाराशिव येथील जमिन गट क्र.१३७ वरील फेरफार क्र.२७४७ नोंद दि.१४.०६.२०२२ ला मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार, आक्षेप व हरकत नसताना आर.ओ.आर प्रकरण क्र.२४४/२०२२ हे नियमानुसार चालवता येत नसताना का चालवले त्याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रथम अपील दाखल केलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. या नंतर अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध

करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन दि.१८.०६.२०२५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी माहिती मिळाल्याचे, समाधान झाल्याचे व अपील अर्ज माघारी घेत असल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांचे असे निवेदन विचारात घेऊन विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देत नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व माहिती प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थी यांनी लेखी स्वरुपात मान्य केले असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6855 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ९३५८/२०२४
बोर्ड क्र.५५

श्री.इलियास आखलाक शेख,
रा.सांजा चौक, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२१.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.जी.शिंदे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०५.२०२४ | मौजे धाराशिव येथील जमीन सर्वे नं.२१०/१/१, २१०/१/३ सय्यद मोईनोद्दीन इसाकोद्दीन काझी, बब्रुवान, जगन्नाथ, शिवाजी रामभाऊ पवार यांना अकृषीक परवाना क्र.NAA/८३/८ = ३४ दि.३१.०८.१९८३ रोजी जारी अकृषीक परवाना संचिका देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखकक्षाशी संबंधित असल्यामुळे दि.२४.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा अभिलेखपाल यांचे कलम ५ (४) नुसार सहाय्य घेण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०२.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला असता ती आढळुन आलेली नाही. संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा अभिलेखपाल यांनी दि.१२.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध होत नसल्याने ती देता येणे शक्य होत

नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती कळविली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी / सहायक जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे योग्य ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6856 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १११२८/२०२४**
**बोर्ड क्र.५६**

श्रीमती प्रमिला काकासाहेब दुधे, — अपिलार्थी
रा.स.नं. १९/०२, हातलादेवी रोड, जाधववाडी फाटा, हनुमान चौक,
धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.जी.शिंदे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०८.२०२४ | शेतरस्ता खुला करणेबाबत मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ तसेच इतर सर्व संबंधित व अनुषंगिक अधिनियमानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत तीन मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने एकत्रित / संकलित करुन अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

असमाधानकारक कार्यवाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (म-१), तहसिल कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6857 दिनांक :- 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ११२३/२०२४**
**बोर्ड क्र.५७**

श्री.जाधव गणेश शिवाजी,
रा.बंरमगाव बु., पो.रुईभर, ता.जि.धाराशिव
: अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव
: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०८.२०२३ | श्री.चंद्रकांत जगन्नाथ मगर, रा.शिंगोली, ता.जि.उस्मानाबाद यांच्या पोलीस पाटील पदास मुदतवाढ मिळणेसाठी दाखल करण्यात आलेल्या पूर्ण कागदपत्रांची मूळ संचिका मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपूर्ण प्राप्त प्राप्त झालेली आहे. सदर मागणी केलेल्या माहितीमध्ये उत्तरपत्रिकेची प्रत मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित शुल्काचा भरणा करणेबाबत सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर दि.१६.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जातील मागणीप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील माहितीच्या मागणीमध्ये उत्तरपत्रिकेच्या मागणीचा समावेश असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे आज रोजी अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याच्या

आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास कोणताही तथ्यांश दिसुन येत नाही.
सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6858 दिनांक : 26/06/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०४१९/२०२४**
**बोर्ड क्र.५८**

श्री.स्वामी सोमनाथ शिवमुर्ती,
रा.खारी, पो.खारगाव, ता.रोहा, जि.रायगड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२५.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०६.२०२४ | संबंधित महसूल कर्मचाऱ्यांचा कोणताही मोबदला सर्व्हिसचा तलाठी व मंडळ अधिकारी यांना देणेबाबत दि.१०.१२.२०१८ रोजी समक्ष सुनावणी झाली (मी गैरहजर होतो) तलाठी साहेब व मंडळ अधिकारी साहेब यांनी लेखी म्हणणे मांडले त्यांचे अभिप्रायासह माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी शुल्क भरुन माहिती घेण्याचे कळविलेले आहे. तथापि नेमके किती शुल्क भरायचे हे कळविले नसल्यामुळे शुल्काचा भरणा करण्यात आलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या मुदतीनंतर माहिती अर्जास प्रतिसाद दिलेला आहे. म्हणून माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, संचिकेत उपलब्ध असलेल्या कागदपत्राची पाहणी

करुन आवश्यक कागदपत्राची रितसर मागणी केल्यास नियमानुसार फीसचा भरणा करुन माहिती देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कार्यवाही केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6859 दिनांक :- 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १०४३०/२०२४
बोर्ड क्र.५९

श्री.दासराव त्रिंबकराव देशपांडे, — अपिलार्थी
रा.देवी मंदिराच्या पाठीमागे, उंबरेकोठा, धाराशिव, ता.जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२५.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे:-

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०३.२०२४ | मौजे देवळाली ता.जि.धाराशिव येथील जमीन सर्व्हे नंबर १२४/१ चे पुनर्वसनासाठी संपादित क्षेत्राचा मावेजा दि.नोव्हेंबर १९९५ ला वाटप झाला, त्याचे अगोदर सदर सर्व्हे नंबर मधील वादग्रस्त क्षेत्राची मालकी मिळाले बाबत अर्जदार त्रिंबकराव नरहरराव देशपांडे यांनी दि.२६.०९.१९९५ रोजी आपल्याकडे अर्ज दिला होता हे खरे आहे का,<br>सदर अर्जावर आजतागायत झालेल्या निर्णयाची माहिती देण्यात यावी किंवा निर्णय घेतला किंवा नाही याचीही माहिती द्यावी, तसेच सदर जमीन सर्व्हे नंबर १२४/१ ज्याचा संयुक्त मोजणीमध्ये सुलभ कार्यवाहीस्तव १२४/१अ व १२४/१ब असे विभागणी करण्यात आली, सदर दोन्ही हिस्याचे (सर्व्हे नंबर १२४/१) या जमिनीचे अर्जदार त्रिंबकराव नरहरराव देशपांडे हे मालक झाल्यामुळे त्याचा ०.८७ व ०.८६ या एकुण क्षेत्राचा मावेजा अर्जदारास देण्यात यावा, या आशयाचे अर्ज अर्जदारयांनी दिनांक २६.०९.१९९५ ते दि.१०.०२.२०२३ पर्यंत (म्हणजे मा.उपविभागीय अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक २२२१/२०२० मध्ये ॲडिशनल ॲफिडेव्हीट दाखल करेपर्यंत) दिलेले आहेत त्याची कार्यवाहीसह सत्यप्रत देण्यात यावी किंवा सर्व अर्ज प्रलंबित आहेत का याची माहिती देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपील नामंजूर केल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, संचिकेत उपलब्ध असलेल्या कागदपत्राची पाहणी करुन आवश्यक कागदपत्राची रितसर मागणी करुन नियमानुसार फीस भरणा केल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी संचिकेची पाहणी करुन आवश्यक कागदपत्राच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व अपिलार्थी यांनी तशी पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०५.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०५.०४.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6860 दिनांक : 26/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८५८/२०२४**
**बोर्ड क्र.६०**

श्री.राजाभाऊ उत्तमराव पवार,
रा.करंजकल्ला, ता.कळंब, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.गोकुळ भराडिया उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०६.२०२३ | सन १९९० ते आजतागायतपर्यंत,<br>मौजे करंजकल्ला ता.कळंब येथील फेर क्रमांक ३४० व या फेर क्रमांकाची संपूर्ण संचिकेच्या कागदपत्राच्या सत्यप्रती व सर्व्हे नंबर १३४ व ११ १३० ची ७/१२, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.१०.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला असता फेर क्रमांक ३४० ची संचिका आढळुन आली नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आलेली नाही. तसेच उर्वरित ७/१२ ची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आली असुन सदर ७/१२ ची प्रत आज रोजी सोबत देखील आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम

अपिलावर सुनावणी घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केले की, शोध घेऊन माहिती उपलब्ध झालेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द (अभिलेखाची जतन कालावधी विचारात घेऊन) तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र. इं.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6910 दिनांक : 06/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ९४४/२०२४**
**बोर्ड क्र.६१**

श्री.काकासाहेब भास्कर गंभीरे, — अपिलार्थी
रा.गंभीरवाडी, पो.इटकुर, ता.कळंब, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.गोकुळ भराडिया उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०५.२०२३ | मौ.गंभीरवाडी गावठाण पासुन ते पश्चिमकडील ३०८ ग.नं.पर्यंत चतु:सिमेची माहिती मिळणेबाबत वरील तपशिलातील विषयाप्रमाणे मौ.गंभीरवाडी गावठाण पासुन पश्चिम कडील विश्वनाथ वगैरे यांचे शेतापर्यंत त्या रस्त्याचे दक्षिण व उत्तर बाजुस असलेले चतु:सिमेस असणारे शेतकऱ्यांचे नाव व गट नंबर माहिती देणेबाबतची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१५.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये ७/१२ उताऱ्याची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊन दक्षिण व उत्तर बाजूस असलेल्या शेतकऱ्यांच्या नाव व गट नंबरचा अभिलेख उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.०९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान झालेल्या

युक्तिवादावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती तलाठी, सजा गंभीरवाडी यांचेशी संबंधित असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित तलाठी यांचेकडे वर्ग करण्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. त्या नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित तलाठी यांचेकडे वर्ग केला असल्याचे समजते. तथापि संबंधित तलाठी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अत: अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, देण्यात आलेली माहिती विसंगत व अर्थबोध होत नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या कालावधीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार विहित मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरण झालेले नाही. म्हणून अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन (तलाठी, सजा गंभीरवाडी) कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.
२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6909 दिनांक : 26/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १३०१/२०२४
बोर्ड क्र.६२

श्री.अश्रुबा धोंडिबा गाडे,
रा.गंभीरवाडी, ता.कळंब, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.गोकुळ भराडिया उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०७.२०२३ | कळंब तालुका तहसिल कार्यालयात शेत रस्त्यासंबंधी आलेल्या सर्व तक्रारी अर्जासंबंधी माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे संपूर्ण कळंब तालुक्याशी संबंधित माहिती मोघमपणे मागितली असुन सदर माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी माहितीची मागणी करताना नेमका संदर्भ नमूद करुन माहितीची मागणी केलेली नाही. त्यामुळे अशी माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आलेली नाही. अत: अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित

केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. तथापि अशा स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7398 दिनांक : 02/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७५२३/२०२४
बोर्ड क्र.६३

श्री.चंद्रकांत दशरथ नव्हाट, — अपिलार्थी
रा.५०४, साई गणराज प्लाझा, मजिदुन इंग्लिश शाळेच्या समोर,
बिंदुमाधवनगर, दिघा, नवीन मुंबई

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१५.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.गोकुळ भराडिया उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०३.२०२४ | मु.पो.ईटकुर, ता.कळंब, जि.धाराशिव येथील भूमापन क्रमांक व उपविभाग (सर्व्हे क्र.११४३) ही जमीन (८० आर) त्यापैकी श्री.चंद्रकांत दशरथ नव्हाट (अ.पा.क्र.) यांच्या नावे असलेली जमीन (४० आर) एवढी जमीन श्री.विठ्ठल जोतिराम नव्हाट खाते क्रमांक ३८७३ व फेरफार क्रमांक १११ हा असुन यांनी स्वत:च्या नावावर करणेकरिता सादर केलेला अर्ज व अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची प्रत व माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तलाठी, सजा ईटकुर या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.१९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार संबंधित तलाठी, सजा इटकुर यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध

करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांच्याशी संबंधित महसूल प्रकरणात तहसिलदार यांनी निर्णय पारित केला असुन सदर निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहिती व वस्तुस्थितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले असुन त्यांनी तसे प्रकरणात कोणतीही हरकत नसल्याचे लेखी स्वरुपात मान्य केलेले आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांचे आज रोजी आयोगासमोर विचाराधिन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी, अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व अपिलार्थी यांनी प्रकरणात हरकत नसल्याचे लेखी मान्य केले असल्याचे अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.: 7412 दिनांक :- ~~7/202~~ 2/7/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ८५३९/२०२४
बोर्ड क्र.६४

श्री.चंद्रकांत दशरथ नव्हाट, — अपिलार्थी
रा.५०४, साई गणराज प्लाझा, मजिदुन इंग्लिश शाळेच्या समोर,
बिंदुमाधवनगर, दिघा, नवीन मुंबई

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.गोकुळ भराडिया उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०४.२०२४ | अवैध गौण खनिज उत्खननाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितावर योग्य ते कायदेशीर कार्यवाही करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष तसेच शासकीय कर्तव्यात भ्रष्टाचार / कुचराई करणाऱ्या तालुका महसूल प्रशासनातील दि.१३.०३.२०२३ पासुन अद्यापपर्यंत कर्तव्य बजावलेल्या व बजावत असलेल्या अधिकारी, वरिष्ठ अधिकारी (मा.तहसिलदार व मा.नायब तहसिलदाराची) पूर्ण नावासहीत पदनाम इ. माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात बाजु मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीकोनातून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दोन - तीन वेळा संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या पत्त्यावर अपिलार्थी राहत नसल्यामुळे सुनावणी नोटीस तामिल करता आलेली नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.२४.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. उर्वरित माहिती (तहसिलदार कळंब यांचे दि.०४.०२.२०२५ रोजीचे पत्र) संबंधित

विभागाकडुन प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मोघमपणे माहितीची मागणी केलेली आहे. त्यामुळे जेवढी माहिती देता येणे शक्य आहे तेवढी दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत माहिती उपलब्ध केली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मोघम माहितीची मागणी केलेली आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7413 दिनांक : 2/7/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०५९२/२०२४**
**बोर्ड क्र.६५**

श्री.राहुल गोरख गाडे, — अपिलार्थी
रा.आंदोरा, ता.कळंब, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.गोकुळ भराडिया उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०९.२०२३ | १. श्रावण बाळ, विधवा, अपंग निराधार योजने अंतर्गत ऑगस्ट २०२४ बैठकीतील मंजूर व त्रुटीतील सर्व अर्जदाराच्या अर्जाविषयी माहिती मिळणे,<br>२. अर्जदारांचे अर्ज, अर्जासोबत तलाठी अहवाल,<br>३. वैद्यकीय अधिकारी यांचे वयाबाबतचे प्रमाणपत्र,<br>४. संबंधित अर्जदारांचे आधार कार्ड,<br>५. वरील योजनेविषयी शासनाच्या परिपत्रकाची सर्व झेरॉक्स प्रती मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची तसेच ती एका पेक्षा जास्त विषयाशी संबंधित आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०३.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन एका विषयाशी संबंधित मुद्दा क्र.१ ची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर माहिती अनुज्ञेय आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 7416 दिनांक : 09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ११०७८/२०२४**
**बोर्ड क्र.६६**

श्री.वैभव नंदकुमार कुलकर्णी, — अपिलार्थी
रा.सापनाई, ता.कळंब, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल),
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), श्री.गोकुळ भराडिया उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०६.२०२४ | मौजे सापनाई येथील गट क्र.२६७ सर्व्हे नं.९० मधील फेर क्रमांक ३४० सन १९९० व ४१३ च्या फेर व त्याच्या संचिकेच्या साक्षांकित प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळ ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखामध्ये शोध घेऊनही ती उपलब्ध न झाल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०५.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, संबंधित तलाठी, सजा सापनाई यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांना

आवश्यक असलेल्या माहितीचा तलाठी, सजा सापनाई या कार्यालयात व्यक्तिश: जाऊन शोध घेण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा तलाठी, सजा सापनाई या कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहुन शोध घेतला असता अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती आढळ झालेली नाही. त्यामुळे अशी माहिती अपिलार्थीस देता आलेली नाही. मात्र तलाठी, सजा सापनाई या कार्यालयात माहितीचा शोध घेत असताना, १. वाटणी फेर फार पत्रक ३४० व ३४१, २. वाटणी फेर फार पत्रक क्र.४१३ व ४१४ च्या छायांकित प्रती उपलब्ध झाल्या असुन अशी पुरक माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. या परिस्थितीत, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदत कायदा भंग केल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, शोध घेऊनही माहिती उपलब्ध झाली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द (अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन) तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7414 दिनांक : 2/7/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ४१४२/२०२४
बोर्ड क्र.६७

श्री.नागसेन हणमंतराव बनसोडे, — अपिलार्थी
रा.मुरुम, ता.उमरगा, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
तलाठी,
तलाठी सजा मुरुम, ता.उमरगा, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, उमरगा, जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा तलाठी, श्री.सुरेश निवृत्ती खरात उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०७.२०२३ | १.सन २०२० पासुन ते आजच्या तारखेपर्यंत फेरफार नोंद करण्यात आलेल्या फेरफारच्या नकला,<br>२. फेर नोंद करणेबाबत शेतकऱ्यांचे आलेल्या अर्जाची छायांकित प्रती अर्जासोवत जोडलेल्या सहपत्रसह उपलब्ध करुन मिळावी,<br>३. फेरफार नोंद केलेल्या शेतकरी निहाय शुल्क पावत्या तसेच,<br>४. सदर शुल्काची रक्कम शासकीय कोषागारात भरणा केलेली चलनाची छायांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार माहिती घेऊन जाणेबाबत अपिलार्थी यांना अवगत

केले असता अपिलार्थी यांना माहिती घेण्यासाठी आले नाही. त्याऐवजी अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. या नंतर अपिलार्थी यांना माहिती घेऊन जाणेबाबत अनेक वेळा सुचित केलेले आहे. मात्र अपिलार्थी माहिती घेण्यासाठी कार्यालयात व्यक्तिशः आलेले नाहीत. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती जवळजवळ १४ ते १५ हजार पृष्ठांची आहे. अपिलार्थी यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र.३ व ४ नुसार मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. त्यामुळे अशी माहिती निरंक आहे. अपिलार्थी यांनी ज्या फेरफारची माहिती मागितलेली आहे त्या फेरफारमध्ये अपिलार्थी यांचा कोणताही हित संबंध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 1397 दिनांक : 02/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ४७०८ ते ४७११ व ४७५४/२०२४ (०५)**
**बोर्ड क्र.६८ ते ७२**

श्री.माणिक मारुती सुपनार,
रा.आशिष निवास, एम.जी. रोड, श्रीकृष्ण मंदिरामागे, वरुळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल)
तहसिल कार्यालय, उमरगा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, उमरगा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२४ (०४) व दि.०६.०५.२०२४ (०१) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), श्री.बोरुळे भिमाशंकर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६८ | २०.११.२०२३ | श्री.उध्दव इरापा मदने यांनी दि.३०.१०.२०२३ रोजी तहसिल कार्यालयाकडे सादर केलेला असुन त्याची प्रत आमचेकडे प्रतिलिपी म्हणून सादर केल्याने त्याबाबत तीन मुद्यांवर माहिती मिळणेबाबत, |
| ६९ | १५.११.२०२३ | श्री.उध्दव इरापा मदने, रा.बोरी, ता.उमरगा यांनी आपल्या कार्यालयाकडे सदर प्रकरणी दि.३०.१०.२०२३ रोजी आपण सांगितलेल्या त्रुटी पूर्ण करुन प्रकरण सादर केले होते, त्याची प्रत माहितीसाठी आमच्याकडे आल्याने त्याबाबत दोन मुद्यांवर माहिती, |
| ७० | २०.११.२०२३ | श्री.उध्दव इरापा मदने यांनी दि.३०.१०.२०२३ रोजी तहसिल कार्यालयाकडे सादर केलेला असुन त्याची प्रत आमचेकडे प्रतिलिपी म्हणून सादर केल्याने त्याबाबत तीन मुद्यांवर माहिती मिळणेबाबत, |

| | | |
|---|---|---|
| ७१ | १५.११.२०२३ | श्री.उध्दव इरापा मदने, रा.बोरी, ता.उमरगा दिनांक ०२.०८.२०२३ च्या अनुषंगाने व तहसिल उमरगा दि.०१.०९.२०२३ च्या पत्रानुसार दोन मुद्यांवर माहिती, |
| ७२ | २९.०१.२०२४ | श्री.उध्दव इरापा मदने, रा.बोरी, ता.उमरगा यांनी दि.२६.०८.२०२२ व दि.०२.०८.२०२३ च्या अर्जानुसार तहसिल कार्यालय यांनी दि.३०.११.२०२३ च्या पत्राच्या अनुषंगाने दोन मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, उमरगा, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद पाच जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, उमरगा, जि.धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ७५११ दिनांक : 2/7/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - ४४५३/२०२४**
**बोर्ड क्र.७३**

श्री.दत्तात्रय शरणय्या स्वामी,
रा.लोहारा बु., ता.लोहारा, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, लोहारा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, लोहारा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मोरे नाना खंडू उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.२०२३ | ॲड. एम एस.वचने यांच्या मार्फत तहसिलदार (शोभा पुजारी मॅडम) यांना रजिस्टर पोच देय पत्राने पाठविलेली दि.०१.०३.२०१८ ते दि.०१.०४.२०१८ नोटीशीच्या प्रती देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि आयोगाकडील सुनावणीची नोटीस कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून अपिलार्थी यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता चौकशीअंती अपिलार्थी मयत असल्याचे समजून आलेले आहे. या संदर्भात अपिलार्थी यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करुन घेतली असुन ती आज रोजी आयोगाच्या पटलावर सादर करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 7410 दिनांक : 21/7/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ६१३१/२०२४
बोर्ड क्र.७४

श्रीमती पंचाक्षरी कृष्णा चव्हाण,
रा.रुद्रवाडी, पो.जेवळी, ता.लोहारा, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, लोहारा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, लोहारा, जि.धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.मोरे नाना खंडु उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०३.२०२४ | १.जिल्हादंडाधिकारी कार्यालय धाराशिव दि.१४.०२.२०२४ जा.क्र.२०२४ / उपचिटणीस / एमएजी -४ कावि, आमरण उपोषण प्राधान्य / तात्काळ या आदेशाप्रमाणे संपूर्ण कार्यवाही केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी,<br>२. आमरण उपोषण निवेदनाची प्रत जोडत आहे व उपोषणाची मागणी केलेल्याची प्रत जोडली आहे,<br>३. आपल्याला आदेश दिलेल्याची प्रत दि.१४.०२.२०२४ ची प्रत जोडत आहे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे

वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने शिघ्रतेने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, लोहारा, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, लोहारा, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7415 दिनांक :- 04/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७९०६/२०२४**
**बोर्ड क्र.७५**

श्रीमती अनिता बाळासाहेब होरे, — अपिलार्थी
रा.श्रीपूर, ता.माळसिरस, जि.सोलापूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
सजा आसु, ता.परंडा, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, परंडा, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.नागटिळक अश्विनी मोहन, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.विजयकुमार वाडकर, निवासी नायब तहसिलदार उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०३.२०२४ | १.मौजे पिंपळवाडी येथील क्षेत्र गट क्र.१४७, १११, ८९, ३३ या क्षेत्रातील अनुदान, पीएम विमा कोणाच्या नावे जमा होते व कोणत्या सहमतीने करण्यात आला, त्याच्या सर्व सत्यप्रती झेरॉक्स मिळणेबाबत व संपूर्ण संचिका मिळणेबाबत,<br>२. मौजे सरणवाडी येथील गट नं.१०० मधील अनुदान पीएम विमा कोणाच्या नावे जमा होते व कोणत्या सहमतीने करण्यात आला, त्याच्या सर्व सत्यप्रती झेरॉक्स मिळणेबाबत व संपूर्ण संचिका मिळणेबाबत,<br>३. गट नंबर १४७, १११, ८९, ३३ या क्षेत्रातील उचलेली शासकीय रक्कम कोणत्या कंपनीव्दारे जमा केलेली आहे याची माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील योजना

महसूल विभागाकडुन राबविण्यात येत नसल्याचे कळविलेले आहे. प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे तलाठी कार्यालयाकडे जी माहिती मागितलेली आहे तशीच माहिती कृषि विभागाकडे मागितली असता त्यांनी अशी माहिती महसूल विभागाशी संबंधित असल्याचे अवगत केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात नैसर्गिक आपत्तीबाबतचे अनुदान महसूल विभागाकडुन वितरित करण्यात येते. सामाईक क्षेत्राच्या बाबतीत सर्व खातेदारांची संमती असल्याशिवाय अनुदान वितरित करता येत नाही. अपिलार्थी यांना पिकविमा व पीएम किसान योजनेबाबतच्या अनुदानाची माहिती हवी आहे. मात्र या दोनही योजना महसूल कार्यालयाकडुन राबविण्यात येत नाहीत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील अशी वस्तुस्थिती अपिलार्थी यांना दि.२२.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना कृषि विभागाकडुन प्राप्त होऊ शकते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच, आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.०६.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-7409 दिनांक:- 2/7/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - १२२२/२०२४**
**बोर्ड क्र.७६**

श्री.अनुरथ महादेव कसबे,
रा.गुरुदेव दत्त हायस्कूल जवळ, भूम, ता.भूम, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
तलाठी,
तलाठी सजा भूम, ता.भूम, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, भूम, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.पाटील पी.एम. उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्विकारुन माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशुन लिहिलेले दि.१८.०६.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्यामुळे व समाधान झाले असल्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात यावे, असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१८.०६.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7408 दिनांक : 2/7/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०५८६/२०२४**
**बोर्ड क्र.७७**

श्री.तेजस गोकुळ वीर, — अपिलार्थी
रा.शेंडी, ता.वाशी, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मंडळ अधिकारी,
मंडळ कार्यालय, पारगाव, ता.वाशी, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, वाशी, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०७.२०२४ | तहसिलदार, वाशी यांनी तुमच्या कार्यालयाकडे केलेल्या दि.२६.०६.२०२४ रोजीच्या आदेशावर केलेल्या कार्यवाहीचा तपशिल मिळणेबाबत, दि.२६.०६.२०२४ ते माहिती मिळेपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ कार्यालय, पारगाव, ता.वाशी, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, वाशी, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशाइं

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 7407 दिनांक : 2/7/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
तहसिलदार, तहसिल कार्यालय, वाशी, जि.धाराशिव

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७२२३, ७२२४ व ७४०१/२०२४ (०३)**
**बोर्ड क्र.७८, ७९ व ८०**

श्री.पाटील राजी दामोधर,
रा.हरिभाऊ नगर, कृपासदन रोड, लातूर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ भूवैज्ञानिक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ भूवैज्ञानिक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, धाराशिव — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२४ (०२) व दि.१२.०७.२०२४ (०१) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ भूवैज्ञानिक, श्रीमती एम.आर.डोंगरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक, श्री.सी.डी.चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७८ | २३.०४.२०२४ | अटल भुजल योजना व जलजिवन मिशन अंतर्गत सन २०२१ ते आजपर्यंत मधील निविदा मंजूर झालेल्या कामापैकी मौजे तेरखेड, आळणी, येडशी, कसबे तडवळे, सुंभा, कोलेगाव, टाकळी (ढोकी), रुईभर, खामसवाडी तसेच उमरगा तालुक्यातील सावळसुर, नाई चाकूर, चिरेवाडी, भगतवाडी, कोळेवाडी, एकूरगावाडी, कोथळी, दुधनाळ, दावणमुल्कवाडी, सुपतगाव यामध्ये झालेल्या कामाचे अंदाजपत्रक व निविदेच्या प्रती मिळणेबाबत, |
| ७९ | ०३.०४.२०२४ | अटल भुजल योजना व जलजिवन मिशन अंतर्गत सन २०२३-२४ मधील निविदा मंजूर झालेल्या कामापैकी मौजे तेरखेड, आळणी, येडशी, कसबे तडवळे, सुंभा, कोलेगाव, टाकळी (ढोकी), रुईभर, खामसवाडी तसेच उमरगा तालुक्यातील सावळसुर, नाई चाकूर, चिरेवाडी, भगतवाडी, कोळेवाडी, एकूरगावाडी, कोथळी, दुधनाळ, दावणमुल्कवाडी, सुपतगाव यामध्ये झालेल्या कामाचे अंदाजपत्रक व निविदेच्या प्रती मिळणेबाबत, |

| | | |
|---|---|---|
| ८० | १७.०५.२०२४ | १. सन २०२३-२४ या कालावधीतील मुळेवाडी या गावात अटल भुजल योजनेअंतर्गत घेतलेले बोअर खाजगी जागेत घेतलेले आहे, नियमानुसार तळे किंवा पाणी पुरवठा विहीर या ठिकाणी न घेता खाजगी जागेत घेतलेले आहे, याबाबत अंदाजपत्रक व निविदेच्या प्रती मिळणेबाबत,<br>२.सन २०२३-२४ या कालावधीतील लोहारा तालुक्यातील फत्तेपुरे या गावात अटल भुजल योजनेअंतर्गत घेतलेले बोअर खाजगी जागेत घेतलेले आहे, नियमानुसार तळे किंवा पाणी पुरवठा विहीर या ठिकाणी न घेता खाजगी जागेत घेतलेले आहे, याबाबत अंदाजपत्रक व निविदेच्या प्रती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन देण्यात आलेले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना बोर्ड क्र.७८, ७९ व ८० मधील माहिती अर्जानुसार हवी असलेली माहिती अनुक्रमे दि.१३.०५.२०२४, दि.१५.०४.२०२४ व दि.२८.०५.२०२४ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन तसे जन माहिती अधिकारी यांना उद्देशुन दि.१३.०५.२०२४, दि.१५.०४.२०२४ व दि.२८.०५.२०२४ रोजी लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, **कार्यालयात बोलावून माहिती दाखविण्यात आली, आवश्यक माहितीच्या प्रती देण्यात आल्या, त्याबाबत लेखी स्वरुपात पोहच देत असुन याबाबत कसलीही हरकत नाही,** असे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांचे असे लेखी निवेदन विचारात घेऊन, अपिलार्थी यांची आज रोजी विचाराधिन असलेली तीनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन त्याबाबत हरकत नसल्याचे लेखी स्वरुपात मान्य केले असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.** 7406 **दिनांक :-** 2/7/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - २९७७ व २९७८/२०२३ (०२)**
**बोर्ड क्र.८१ व ८२**

श्री.शेख खालेद शेख अब्दुल कादर,
रा.नुर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिस समोर, जुना बाजार,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.अरुण बाबुलाल पंडुरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८१ | २४.०१.२०२३ | गट नं.१३/२ रावरसपुरा तिसगाव शिवर प्रियदर्शनी कॉलनी, पडेगाव औरंगाबाद येथील गट नं.१३/२ ला लागुन वाहणाऱ्या शासनाची मालकी असलेल्या नदीपात्र जागेवर आपण कोणत्या संस्थेस कोणत्या कागदपत्रे आधारे व सदर परवानगी कोणत्या नियमास धरुन देण्यात येत आहे किंवा कसे याबाबतची व संबंधित संस्थेने आपणास परवानगी मिळणेबाबत कोणकोणती कागदपत्रे आपल्या विभागास सादर केलेले आहे त्या अर्जासोबतची मूळ कागदपत्रांची साक्षांकित कागदपत्रे कृपया त्वरीत देण्यात यावी, |
| ८२ | २४.०१.२०२३ | गट नं.१३/२ रावरसपुरा तिसगाव शिवर प्रियदर्शनी कॉलनी, पडेगाव औरंगाबाद येथील गट नं.१३/२ ला लागुन वाहणाऱ्या शासनाची मालकी असलेली नदीपात्र जागेची रुंदी किती आहे व जागेला लागुन किती योग्य अंतरावर कोणत्याही किंवा कसल्याही प्रकारचा बांधकाम करण्यास आपण कोणत्या नियमान्वये अथवा कोणत्या शासन परिपत्रकानुसार परवानगी देऊ शकता किंवा फेटाळु शकता याबाबतची माहिती लेखी कागदपत्रासह द्यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम तसेच प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अभिप्रेत आहे याचा कोणताही बोध होत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहिती प्रत्यक्ष हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि प्रत्यक्ष / व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे प्रत्यक्ष / व्यक्तिश: संपर्क केला नसल्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देता आलेली नाही. प्रत्यक्ष / व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीचे शुल्क ज्ञात करुन घेणे / माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व आहे. मात्र असे उत्तरदायित्व अपिलार्थी यांनी पार पाडलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे माहितीची मागणी मोघमपणे केलेली आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7405 दिनांक :- 2/7/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ५४७३/२०२३
बोर्ड क्र.८३

श्री.ख्वाजा अब्दुल रहमान अब्दुल सत्तार, — अपिलार्थी
रा.सहारा हॉटेल समोर, कटकट गेट, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, श्री.स.जाकिर अली, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.अरुण बाबुलाल पंडुरे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर करताना त्यासोबत सादर केलेल्या माहिती व प्रथम अपील आणि व्दितीय अपील इ. चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येत आहे की, माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज हा अर्जदार श्री.सय्यद जाकिर अली सय्यद महमूद, रा.छत्रपती संभाजीनगर यांनी सादर केलेला आहे. तर व्दितीय अपिलाचा अर्ज अपिलार्थी, श्री.ख्वाजा अब्दुल रहमान अब्दुल सत्तार, रा.छत्रपती संभाजीनगर यांनी सादर केलेला आहे. श्री.सय्यद जाकीर अली हे श्री.ख्वाजा अब्दुल रहमान अब्दुल सत्तार यांचे प्रतिनिधी म्हणून आज रोजी आयोगासमोर सुनावणीस उपस्थित आहेत.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. ज्या नागरिकास माहितीची आवश्यकता आहे तो प्रत्येक नागरिक माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर करु शकतो. ज्या व्यक्तीने माहितीचा अर्ज सादर केलेला आहे त्याच व्यक्तीने प्रथम व व्दितीय अपिलाचा अर्ज सादर करणे अपेक्षित आहे. या प्रकरणी माहिती प्रथम अपील अर्ज एका व्यक्तीने व व्दितीय अपील अर्ज दुसऱ्या व्यक्तीने सादर केलेला आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7404 दिनांक : 2/7/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७२७४/२०२३
बोर्ड क्र.८४

श्री.शिवाजी तुकाराम जगताप,
रा.मुकुंदवाडी गाव, एन-२, सिडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्राम महसूल अधिकारी,
सजा मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, श्री.सुनिल हरिदास निर्मळ व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.अरुण बाबुलाल पंडुरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०८.२०२३ | मौजे मुकुंदवाडी ता.जि.औरंगाबाद येथील गट क्र.४७/२ मधील आपण घेतलेल्या फेरफारच्या अनुषंगाने खालील माहिती मिळणे सन २०००,<br>१. फेरफार क्र.११०२ ची छायांकित / साक्षांकित प्रत, २. अर्जदार यांच्या अर्जाची छायांकित / साक्षांकित प्रत, ३. अर्जदार यांनी दाखल केलेल्या नोंदणीकृत खरेदी खताच्या साक्षांकित प्रती, ४. तलाठी मौजे मुकुंदवाडी यांनी काढलेल्या नोटीसची साक्षांकित प्रत, ५. मुळ संचिकाची साक्षांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच दोन दिवसापूर्वी स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील

संचिका अभिलेखात आढळ झाली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नसल्याचे निदर्शनास येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून नायब तहसिलदार (महसूल), अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द (अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन) तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 7403 दिनांक : 2/7/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८३८६/२०२३**
**बोर्ड क्र.८५**

श्री.रहिम अहेमद पठाण, — अपिलार्थी
रा.इंदिरानगर, पंढरपूर, वार्ड क्र.०४, ता.जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल) /
अभिलेखपाल (अभिलेख कक्ष),
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.अरुण पंडुरे व संबंधित अभिलेखपाल उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०९.२०२३ | जा.क्र.७५/म.ज.म.सरकारी / अतिक्रमण / खासबाब / कावि / विशेष नोंद / कार्यालय तहसिल औरंगाबाद दि.२३.०१.१९७५ अंतर्गत असलेले आदेश व त्यानुसार गट नं.१७५ वळदगाव सरकारी गायरान जमीन मधील इतर अधिकार मधील १२९ लाभार्थ्यांची यादी मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अभिलेखपाल, अभिलेख कक्ष यांचेशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.१८.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये संबंधित अभिलेखपाल यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचे अपिलार्थीस प्रदान झाले किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

संबंधित अभिलेखपाल यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अभिलेखपाल या पदाचा पदभार नुकताच एक दिवसापूर्वी स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची दक्षता घेण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती विहित मुदतीत मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून नायब तहसिलदार (महसूल), अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल), अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहितीं संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द (**अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन**) तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

५/२/।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 7402 **दिनांक :** 02/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ३५९५/२०२३
बोर्ड क्र.८६

श्री.रामदास पांडुरंग गाडेकर, — अपिलार्थी
रा.चोरवाघलगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, चिंचवडगाव,
ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०२.२०२३ | कै.कमळाबाई कडू वाघ यांचे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनाव्दे, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचवडगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस

दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7401 दिनांक : 2/7/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ७३६०/२०२३
बोर्ड क्र.८७

श्री.एस.एस.कर्णेवार,
रा.४६, चंद्रश्रध्दा, विष्णूनगर, वसमत रोड, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, किनवट,
मुख्यालय प्लॉट नंबर ०४, सेक्टर सी-१, टाऊन सेंटर, सारस्वत
बँक जवळ, सिडको, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, किनवट,
मुख्यालय प्लॉट नंबर ०४, सेक्टर सी-१, टाऊन सेंटर, सारस्वत
बँक जवळ, सिडको, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१६.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०९.२०२३ | श्रीमती विजयालक्ष्मी किशनराव तुंगेनवार, सहशिक्षिका यांचे प्रमाणपत्र तपासणीस सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत... |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०१.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, कलम ११ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व

कलम ११ (१) नुसार त्रयस्थांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उघड केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. तसेच अपिलार्थी यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचे दि.१४.०६.२०२५ रोजीचे (प्राप्त दि.१६.०६.२०२५) रोजीचे लेखी म्हणणे आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये अपिलार्थी यांनी, मागणी केलेली माहिती उघड केल्यामुळे साध्य होणाऱ्या व्यापक जनहिताच्या समर्थनार्थ काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7400 दिनांक : 2/7/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ७२११/२०२३**
**बोर्ड क्र.८८**

श्री.अशोक संपतराव ढमढेरे,
रा.सी.एल.७/५५/४, १२ वी योजना, शिवाजीनगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
स्व.शंकरराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
हरिओम नगर, रांजणगाव (शे.पु.),
ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
स्व.शंकरराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
हरिओम नगर, रांजणगाव (शे.पु.),
ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.बनकर सुमित सुर्यभान उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे, कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०८.२०२३ | १.आपल्या शाळेतील कार्यरत शिक्षकांना मा.शिक्षणाधिकारी (मा) जि.प.औरंगाबाद यांनी शैक्षणिक वर्ष २००६ ते आजपर्यंत दिलेल्या वैयक्तिक मान्यता व सेवासातत्याच्या छायांकित व प्रमाणित प्रती,<br>२. आपल्या कार्यालयामार्फत शैक्षणिक वर्ष २००६ ते आजपर्यंत मा.शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.औरंगाबाद यांना सादर केलेल्या वैयक्तिक मान्यता व सेवासातत्य प्रस्तावाच्या छायांकित व प्रमाणित प्रती,<br>३. आपल्या शाळेतील वर्ष २००६ ते आजपर्यंतच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिलेले राजीनामे यांच्या छायांकित व प्रमाणित प्रती,<br>४. आपल्या शाळेतील वर्ष २०११ ते २०१४ पर्यंतच्या प्रवेश निर्गम रजिस्टरच्या छायांकित व प्रमाणित प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार माहिती केलेल्या माहितीच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली व देय होणारी माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहिती व वस्तुस्थितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नसल्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, प्रथम अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7399 दिनांक : 02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - २८१०/२०२३**
**बोर्ड क्र.८९**

श्री.सचिन रमेश साळवे, — अपिलार्थी
रा.पैठण गेट, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रबंधक,
शासकीय विज्ञान संस्था, निपटनिरंजन नगर, न्यू पहाडसिंगपुरा,
हनुमान टेकडी रोड, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
संचालक,
शासकीय विज्ञान संस्था, निपटनिरंजन नगर, न्यू पहाडसिंगपुरा,
हनुमान टेकडी रोड, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, श्री.पी.के.खोब्रागडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, श्री.डॉ.आर.ए.सातपुडे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.१२.२०२२ | डॉ.सतीश माधवराव देशपांडे (भूगर्भशास्त्र विभाग) यांच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती दि.१७.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.०२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. सदर सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांना पूर्वी दिलेल्या माहितीशिवाय अतिरिक्त माहिती देण्यात आलेली आहे. पूर्वी दिलेल्या व सुनावणीदरम्यान दिलेल्या माहितीने अपिलार्थी यांचे निराकरण झालेले आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील सपुष्ठांत येत असल्याचा निष्कर्ष काढुन निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-7396- दिनांक :-02/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ५८७६/२०२३
बोर्ड क्र.९०

श्री.पुनमचंद गुरुदयालसिंग राठोड,
रा.शांतीनगर, प्लॉट क्र.४१, काशीनाथ जाधव शाळेसमोर, गुरुदत्त हौऊसिंग सोसायटी, कॉलेज रोड, कन्नड,
ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जय बालाजी अनुदानित आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, शिऊर बंगला, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राधाकृष्ण मंगल कार्यालयासमोर, रिलाएन्स मॉल शेजारी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १९.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच, आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०४.२०२३ | १.सन २०११-२०१२ ते २०२२-२०२३ या वर्षापर्यंत कै.गुरुदयालसिंग राठोड मागास वर्गीय शिक्षण संस्था संचलित जय बालाजी आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा शिऊर ता.वैजापूर या शाळेसाठी दिले गेलेले इमारत भाडे कोणत्या व्यक्तीच्या नावे दिले या बाबत देयकाच्या किंवा कार्यालयीन आदेशाची प्रती सत्यप्रतीसह मिळाव्या,<br>२. जय बालाजी आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा शिऊर, ता.वैजापूर येथील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर मिळणारे वेतनेत्तर अनुदानाच्या देयकाच्या किंवा कार्यालयीन आदेशाच्या सत्यप्रती, सन २०११-२०१२ ते २०२२-२०२३ पर्यंत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.२४.०७.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, दहा दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली विस्तृत व मोठ्या कालावधीची असुन ती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जय बालाजी अनुदानित आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, शिऊर बंगला, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची म्हणजेच मुद्दा क्र.१), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ~~७३९५~~ 7395 दिनांक : 02/07/2025